


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार २४ सप्टेंबर २०२४ | अंक २८९० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# विरोधी पक्ष आता कुठाय? विधानसभा आलीय म्हणून मराठा नकोय का?; संभाजी राजे यांचा सवाल?

## तर सरकार जबाबदार असेल, संभाजीराजे यांनी सरकारला दिला इशारा

मराठा समाजाला आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मागच्या सात दिवसांपासून उपोषण करत आहेत. जालन्यातील अंतरवली सराटीत त्यांचं उपोषण सुरु आहे. आज या उपोषणाच्या सातव्या दिवशी आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे अंतरवली सराटीमध्ये पोहचले आहेत. संभाजीराजे उपोषणस्थळी येत मनोज जरांगेंच्या तब्येतीची चौकशी केली आहे. या उपोषणस्थळावरून संभाजीराजे यांनी सरकारला इशारा दिला आहे. मनोज जरांगेंना काही झालं तर सरकार जबाबदार असेल, असा इशारा संभाजीराजे यांनी सरकारला दिला आहे.



मराठा सामाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसलं आहे. गेल्या सात दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे उपोषण करत आहेत. जालन्यातील अंतरवली सराटीत त्यांचं उपोषण सुरु आहे. मनोज जरांगे यांची तब्ब्येत खालवली आहे. यामुळे स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे अंतरवली सराटीमध्ये पोहचले आहेत. यावेळी त्यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्यानंतर संभाजीराजे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यासंह विरोधकांवरही टीका केली. विरोधी पक्षातील नेतेही बघ्याची भूमिका घेत आहेत. हे चालणार नाही. हे तुमचं कॅबिनेट आहे ना... घ्याना निर्णय मग. हो की नाही बोलून टाका, असे संभाजीराजे म्हणाले.

## "सरकार निवांत मुंबईत"

"मनोज जरांगे पाटील हे या वर्षात सहाव्यांदा आंदोलन आणि आमरण उपोषणाला बसले आहेत. राज्यातील इतिहासातील शरमेची बाब आहे. एक व्यक्ती समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी जीवाची बाजी लावायला बसला आहे. त्याची दखल किंबहूना त्यावरचा निर्णय या सरकारने घेतलेला नाही. मी डॉक्टर्सकडून सर्व रिपोर्ट घेतले आहेत. परवा रायगडवर मी गेलो होतो. त्यावेळी मला कळलं की मनोज जरांगे यांची तब्येत खालावली आहे. त्यामुळे मी त्यांना पाहण्यासाठी प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आलो आहे. त्यांचा जीव तुमच्यासाठी आहे. त्यांचा जीव महत्त्वाचा आहे. त्यामुळे मी त्यांना पाहायला आलोय. मला दु:खी वाटतं. वेदना होत आहे. एवढी तब्येत खालावूनही... आता तर त्यांनी सलाईन घ्यायचं बंद केलं आहे. सरकार निवांत मुंबईत एअर कंडिन्शन्स ऑफिसात बसले आहेत", असा आरोप संभाजीराजेंनी केला.



# संभाजी भोसले तुम्ही जात दाखवली, तुम्ही शाहूंचे वंशज नव्हेत; लक्ष्मण हाकेंचा घणाघात

जालना वार्ताहर

मनोज जरांगे पाटील हे अंतरवली सराटीत उपोषण करत आहेत. संभाजीराजे छत्रपती यांनी काल अंतरवलीत जात जरांगेंची भेट घेतली. जरांगेंची तब्येत खालावते आहे, त्यांना जर काही झालं तर त्याला सरकारच जबाबदार असेल, असं संभाजीराजे यावेळी म्हणाले. त्यावर ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी टीका केली आहे. मिस्टर संभाजी भोसले, तुम्हाला आता राजे म्हणणार नाही. संभाजी भोसलेंनी त्यांची जात दाखवली. तुम्ही राजर्षी शाहू महाराजांचे वैचारिक वारस नाहीत, असा हल्लाबोल लक्ष्मण हाके यांनी केला आहे. मनोज जरांगे आणि छत्रपती संभाजी राजे यांना गरिबाचा कळवळा नाही.संभाजी राजे तुम्ही बीडमध्ये आरत्या करत होते का? मराठवाड्यात दुकानावर हल्ले केले गेले. संभाजी राजे तुम्हाला राजे म्हणायला लाज वाटतं, असंही हाके म्हणाले आहेत.

# बेताची परिस्थिती आलीच तर मला बोलवा, मी लगेच येईन; संभाजी राजे असं का म्हणाले?

गेल्या आठवड्यापासून उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खालावली असून त्यांनी सलाईन लावू घेण्यासही नकार दिलाय. याच मुद्यावरून बोलताना संभाजी राजे यांनी सरकारला खडेबोल सुनावले आहेत.' आम्ही भरपूर त्रास सहन केला आहे. आता यापुढे नाही चालणार. माझी जरांगेंना साथ आहे. आताही आहे. यापुढेही असणार. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना माझी सूचना आहे की, तुम्ही मेडिकल रिपोर्ट घ्या. परिस्थिती पाहा. हेलिकॉप्टर आहे ना, या तुम्ही इथे. आमच्या डॉक्टरवर विश्वास नाही ना, तर तुमच्या सरकारी यंत्रणांकडून माहिती घ्या. उद्या काही झालं तर सरकार आणि विरोधी पक्ष जबाबदार असेल' असा इशाराच त्यांनी दिला. हा शेवटचा लढा ' मी इथून निघणार आहे, पण तुम्ही मनोज जरांगे यांना धीर द्या. आश्वासन द्या. तुमच्या हावभावातून हा विश्वास द्या. मागच्यावेळी त्यांनी मी पाणी प्या म्हटलं होतं. त्यांनी माझी विनंती मान्य केली होती. पण आता मी त्यांना म्हणणार नाही. त्यांनी त्यांचा निर्णय घ्यायचा आहे. पण तब्येतीला धोका होईल असं त्यांनी काही करू नका'असा सल्ला यांनी दिला. ' सरकारवर प्रेशर टाकण्यासाठी किंवा समाजाची बाजू मांडण्यासाठी म्हणा, मी त्यांना पाणी घ्या म्हणणार नाही. अनेकांनी सांगितलं राजे तुम्ही सांगा तुमचा शब्द पाळतील.



पण हे सरकार आंदोलन गुंडाळण्यास बसले आहेतच. अनेक लोक बसले आहेत. आंदोलन व्हावे ही अनेकांची इच्छा नव्हती. हा शेवटचा लढा आहे. तुम्ही मला रिपोर्ट द्या. त्यांनी ऐकलं नाही तर मला सांगा. बेताची परिस्थिती झाली तर मला सांगा. मी सांगतो, पाणी घेऊ नका, सलाईन लावू नका. पण एक परिस्थिती येईल की ते घ्यावं लागतं तेव्हा मला सांगा. मी कुठेही असलो तरी अंतरवलीत येईल 'असे संभाजी राजे म्हणाले. तुम्हाला याचं जराही गांभीर्य नसेल तर सत्तेत राहून तुमचा उपयोग काय?, असा खड़ा सवाल संभाजीराजेंनी सरकारला विचारला.

## सरपंच-उपसरपंचांच्या वेतनात वाढ, ग्रामसेवक पदाचं नाव बदललं; मंत्रिमंडळ बैठकीत मोठे निर्णय




बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यास अवघे काही दिवस बाकी असताना होत असलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नेमके काय निर्णय घेण्यात येणार, याबाबत उत्सुकता होती. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सरपंच-उपसरपंचांचे वेतन वाढवण्यासह अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी याबाबतची माहिती दिली आहे. राज्यातील सरपंच आणि उपसरपंचांच्या वेतनात दुप्पटीने वाढ करण्यात आली आहे. तसंच ग्रामसेवकपदाचं नाव बदलून ग्रामविकास अधिकारी असं करण्यात आलं असल्याचंही मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितलं आहे.




# जरांगे पाटलाच्या समर्थनार्थ नांदेड बंद ला उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक लोकआरंभ//

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ आज नांदेड शहरासह सर्वच तालुक्यात बंद पुकारून सकल मराठा समाजाच्या वतीने या निर्दयी सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला. मागील दोन दिवसापूर्वी मराठा समाजाच्या वतीने शासनाला अल्टीमेटम देत दोन दिवसात मागण्या मान्य करून जरांगे पाटलांचे उपोषण सोडवा अन्यथा नांदेड जिल्हा बंद ची हाक देण्यात येईल असा खरमरीत ईशारा देऊन सुद्धा सरकार च्या वतीने कुठलेही ठोस पाऊल उचलण्यात आले नसल्याने आज नांदेड शहरासह जिल्ह्यातील तालुक्यात सुद्धा कडकडीत बंद पुकारण्यात आला होता या बंदला सर्व व्यापारीवर्ग, शाळा, खाजगी शिकवणी, स्कुल बस,या सह सर्वच स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद देत बंद पाळण्यात आला. काल सायंकाळी सकल मराठा समाजाच्या वतीने सर्व असोसिएशनला संपर्क साधुन बंद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. एस टी महामंडळा सह सर्वच ठिकाणी प्रशासनाने योग्य ती काळजी घेण्यात आली. शहरात भाग्यनगर हद्दीत काही पोलीसाकडून मराठा समाजातील युवकांना अडवण्याचा प्रयत्न करण्यात आला त्या ठिकाणी सर्व समाज एकत्र येत या कृत्याचा निषेध व्यक्त करीत आक्रमक होऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे त्यांची तक्रार करीत वातावरण शांत करण्यासाठी समाज बांधवानी अतिशय समजदारीची भुमिका घेतली. समाज बांधवानी शहरात मोटारसायकल रॅली काढुन सर्व व्यापारी वर्गाना विनंती करीत मुख्यमंत्री महोदयांना जिल्हाधिकाऱ्या मार्फत मागण्यांचे निवेदन देत आजच्या बंद ची शासनाने त्वरित दखल घ्यावी अन्यथा पुढील काळात मराठा समाज मोठ्या ताकतीने रस्त्यावर उतरेल ते सरकारला परवडणार नाही असा पवीत्रा घेतला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २४ सप्टेंबर २०२४
https://lokaarambh.com



# कर्मचारी पतसंस्था कर्मचाऱ्यांसाठी मोठा आधार : डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात

**बीड (प्रतिनिधी)**
दि.२३ : बीड येथील नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेतचे कार्य उत्कृष्ट असून यामुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार ठरलेली आहे. यात वाढ करत संस्थेने कर्मचाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात करावी, असे मत संस्थेचे सहसचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले. बीड शहरातील नवगण, विनायक शिक्षण संस्थेची नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २७ वी सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२२) सकाळी ११:३० वाजता शहरातील के.एस.के येथील स्पोर्ट्स सभागृहात पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा तथा शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा प्रा.दीपा क्षीरसागर या होत्या. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, संचालक आमेर सिद्दीकी, प्रशासक प्रा. सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक व्ही.टी.देशमाने, पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब चवार, सचिव राजेंद्र कुऱ्हे, विना भोज, लिंबाजी उजगरे, सुनिल सपाटे, रमेश चौरे, सचिन पवार, श्रीहरी लहाने, रिझवान काझी, रमेश जाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अध्यक्ष बालासाहेब चवार आणि संचालक मंडळाचे कौतुक केले. या कर्मचारी संस्थेमुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार मिळत असल्याचे म्हटले. कार्याचा आणखी विस्तार वाढवून बदलत्या काळानुसार विविध उपक्रम राबविण्यात यावेत, असे मत व्यक्त करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच, डॉ.दीपा क्षीरसागर यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. या सर्वसाधारण सभेचे बालासाहेब चवार यांनी प्रास्ताविक करताना कामकाजावर प्रकाश टाकून वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी सर्व मान्यवरांचे कर्मचारी संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन शेख ताजुद्दीन यांनी केले. ही सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मंत्रालयातील मुख्यमंत्री वॉर रूम चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते उद्घाटन

मुंबई, दि. २३: मंत्रालयातील सातव्या माळ्यावर नूतनीकरण केलेल्या ‘ मुख्यमंत्री वॉर रूम’ व म्युरल (भित्तीचित्र) चे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रिमोटची कळ दाबून आज करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे,



प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी वॉर रूममधील सोयी सुविधांची माहिती घेतली. राज्यातील प्रकल्पांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या डॅशबोर्ड, प्रकल्पाची फाईलची सद्यस्थिती, ज्या विभागाकडे प्रलंबित आहे, त्या विभागाला जाणारी नॉटिफिकेशन आदींबाबत माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी घेतली. या सर्व पद्धतीमुळे प्रकल्पाला गती मिळून विहित कालावधीत प्रकल्प पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील पायाभूत सुविधांच्या प्रकल्पावर नियंत्रण ठेवून सातत्याने पाठपुरावा मुख्यमंत्री ‘वॉर रूम’ करीत असते. नवीन वॉर रूम अत्यंत प्रशस्त असून आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज आहे.

**वॉर रूम ची थोडक्यात वैशिष्ट्ये**
*** राज्यातील १५ क्षेत्रातील विविध ७४ प्रकल्पांच्या विविध टप्प्यांवरील कामाचा आढावा.**
*** प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा, निधी देणारी यंत्रणा यांच्यामधे समन्वय.**
*** एक्झिक्यूटिव्ह, सेक्टरल आणि प्रोजेक्ट डॅशबोर्ड ची निर्मिती, या डॅशबोर्डच्या माध्यमातून प्रकल्पाच्या प्रत्येक क्षेत्रातील कामाचे मूल्यमापन.**
*** प्रकल्पाला गती मिळण्यासाठी त्यामधील प्रश्न सोडविण्याकरीता सबंधित विभागाला नॉटिफिकेशन आणि अलर्ट देण्याची सुविधा.**
*** प्रकल्पामधील अडचण दूर करण्यासाठी ‘ रियल टाईम मॉनिटरिंग’ व्यवस्था.**
*** प्रकल्पाच्या प्रगतीमध्ये अडथळा ठरणारे प्रश्न सोडविण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय व ट्रॅकिंग यंत्रणेचा विकास.**

### थोडक्यात वार रूम विषयी..

*कॉर्पोरेट क्षेत्रातील कार्यालयासारखी अंतर्गत रचना व रंगसंगती.
*राज्यात सुरु असलेल्या पायाभूत सोयी सुविधांचे प्रतिबिंब दाखवणारे दर्शनी भागात असणारे आकर्षक भित्तीचित्र
*विविध अँगलमधून सादरीकरण बघणे सहज व्हावे, यासाठी एलईडी स्क्रीन.
*सध्या सुमारे ७० पायाभूत प्रकल्प डॅशबोर्डवर आहेत. ज्यांची एकूण किंमत सुमारे रु. 4 लाख कोटी असून हे प्रकल्प 15 क्षेत्रांमधील आहे.
*सीएम वॉर रूमला आजपर्यंत विविध प्रकल्पांशी संबंधित सुमारे 350 समस्या प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 165 समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे.
*प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी सुमारे 200 हून अधिक बैठका आयोजित केल्या आहेत.

## नागरिकांची काम प्रलंबित ठेवू नका लोकाभिमुख प्रशासनाची गरज — तहसीलदार शेळके




चौसाळा — प्रशासनाला लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चौसाळा महसूल मंडळाची आढावा बैठक आज घेतली. समाजातील सर्व घटकांशी चर्चा करून प्रश्न समजावून घेत सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना लोकाभिमुख प्रशासन राबवण्यासाठी जनतेचे प्रश्न समजून घ्या. त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील रहा, नागरिकांची काम प्रलंबित ठेवू नका अशा सूचना यावेळी दिल्या. चौसाळा महसूल मंडळातील जनतेच्या अडीअडचणी जनतेत गेल्याशिवाय कळणार नाहीत. प्रश्न कळल्याशिवाय लोकाभिमुख प्रशासन राबवता येणार नाही. हे लक्षात घेऊन चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जनतेसह सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांची आढावा बैठक तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बोलवली होती. यावेळी बैठकीत ग्रामपंचायत तर्फे तहसीलदार शेळके यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीत शेतकऱ्यांसह, मजूर, वीज,अनुदान प्रश्न,श्रावण बाळ योजना, ई.के वाय सी, स्वस्त धान्य, मतदार नोंदणी, ई पिक पाहणी, अतिवृष्टी अनुदान, यासारख्या अनेक प्रश्नांची माहिती समाजातील सर्व स्तरातील नागरिकांशी चर्चा करून घेतली. नागरिकांची समस्या जाणून घेत. तात्काळ संबंधित कर्मचाऱ्यांना प्रश्न निकाली काढण्याच्या सूचना तहसीलदार शेळके यांनी दिल्या.अधिकारी कर्मचारी यांच्यात समोरासमोर चर्चा व निराकरण झाल्यामुळे लोकाभिमुख प्रशासन कसं असतं याची चुणूक आज चौसाळकरांना पाहायला मिळाली. यावेळी मंडळ अधिकारी जायेभाये, तलाठी शिवराम येवले, तलाठी कमलेश निर्मळ, तलाठी निशा खांडेकर, तलाठी उषा राठोड,चौसाळा जिल्हापरिषद सदस्य अशोक लोढा,चौसाळा ग्रामपंचायत उपसरपंच अंकुश कळासे,मोहन झोडगे,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर यांच्यासह स्वस्त धान्य दुकानदार, मंडळ कृषी कार्यालयातील कर्मचारी, शिक्षक, चौसाळा ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार व चौसाळा महसूल मंडळातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुग्णसेवक शरद झोडगे यांनी वाचवले अपघात झालेल्या व्यक्तीचे प्राण

बीड प्रतिनिधी -अंकुश गवळी
बार्शी रोड बीड येथील तिडके हॉस्पिटल समोर एका अज्ञात व्यक्तीचा अपघात झालेला होता. तो व्यक्ती अपघात झाल्यामुळे रस्त्यावर तसाच तडफडत होता व डोक्या मधून खूप रक्तस्त्राव होत होता, अनेक लोक तेथे बघ्याची भूमिका घेत होते परंतु शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख शरद झोडगे तेथून जात असताना त्या अपघात झालेल्या व्यक्तीला पाहून लगेच थांबून त्या व्यक्तीला स्वतः व सहकारी मित्र डॉ.दिनेश काळे,महेश जाधव,प्रवीण पालीमकर,अजय जाधव व ईतर सहकार्यांच्या मदतीने उचलून रिक्षामध्ये टाकून जिल्हा रुग्णालय बीड येथे दाखल केले, डोक्याला गंभीर मार असल्यामुळे जिल्हा





रुग्णालय येथे प्रथमोपचार करून डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी हायर सेंटर येथे रेफर करण्यास सांगितले,रुग्णाच्या वडिलांशी संपर्क करून झालेली घटना सांगितली व त्यांच्या वडिलांनी त्यांना संभाजीनगर येथील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. आज रुग्णांच्या वडिलांशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले तब्येत आता ठीक आहे व त्यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवाराचे मनापासून आभार व्यक्त केले..

# स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेत भान शिबिराचे यशस्वी आयोजन

**अंबाजोगाई प्रतिनिधी:-**
पौगंडावस्था म्हणजे मुलांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा. या काळात त्यांच्यात शारीरिक, मानसिक व भावनिक बदल होत असतात. ज्यामुळे मुलांना अनेक प्रकारच्या प्रश्नांचा सामना करावा लागतो. या वयात त्यांच्यात असुरक्षितता, आत्मविश्वासाचा अभाव आणि बदलत्या शरीराबद्दल अनिश्चितता असते. योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे त्यांची विचारसरणी व वर्तनावर परिणाम होऊ शकतो. या काळात त्यांना योग्य समुपदेशन आणि योग्य दिशा देणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा अनेक अडचणीच्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. कित्येकवेळा मुलामुलींच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या घटना या काळात घडू शकतात




म्हणून या वळणावर मुलामुलींना भानावर आणणे गरजेचे असते. यामुळेच स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेत इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पौगंडावस्थेतील अशा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी “भान” शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे तीन दिवसीय शिबिर दि. १९, २० आणि २१ सप्टेंबर २०२४ रोजी शाळेत आयोजित करण्यात आले होते. श्रीमती वैशाली गोस्वामी यांनी विद्यार्थ्यांना पौगंडावस्थेतील शारीरिक व मानसिक बदल, त्यांचे परिणाम, आणि या बदलांना कसे हाताळावे याबाबत सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या शिबिरादरम्यान त्यांचे प्रश्न विचारले व प्रशिक्षक वैशाली ताईंनी त्यांच्या शंकांचे निरसन केले, तसेच मनमोकळेपणाने संवाद साधला. नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय संतोष दादा कुलकर्णी परवानगीने, व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती स्वरुपाताई दिग्रसकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यातून हा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. शाळेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# लिंबागणेश येथे धनगर समाजाचा चक्काजाम ; शासनाने धनगर समाजाला अनुसूचित जमाती ( एसटी) प्रमाणपत्र वितरित आदेशाबाबत शासन निर्णय घ्यावा

**प्रतिनिधी लिंबागणेश -**
:- ( दि.२३) धनगर जमातीला अनुसूचित जमाती (एसटी)चे जात प्रमाणपत्र वितरित करण्याच्या आदेशाबाबत शासन निर्णय काढण्यात यावा या प्रमुख मागणी करत धनगर जमात महाराष्ट्रात पिढ्यानपिढ्या मेंढपाळ आणि पशुपालक म्हणून कार्यरत असुन १९५६ साली अनुसूचित जमातीच्या ( एससी/ एसटी) यादीत धनगड नावाची जात समाविष्ट करण्यात आली.त्यामुळे धनगर जमात गेल्या ६८ वर्षांपासून त्यांच्या संविधानिक हक्कापासून वंचित राहिला आहे.धनगड नावाची जमात अस्तित्वात नसतानाही आणि महाराष्ट्र सरकारने ३ वेळा मुंबई उच्च न्यायालयात ३ वेळा स्पष्ट केले आहे.त्यामुळे धनगर जमातीला अनुसूचित जमात म्हणून मान्यता देणे संविधानाच्या कलम ३४२(१) नुसार आवश्यक आहे.पंढरपुर आणि लातुर येथील उपोषणकर्ते यांचा आज १३ वा दिवस असुन त्यांची प्रकृती चिंताजनक आहे त्यामुळे समाजाच्या भावना तिव्र आहेत. दि.१५ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शासन निर्णय काढण्याचे आश्वासन दिले होते.ते पाळण्यात यावे, समित्या, अहवाल आणि अभ्यास यामध्ये दिशाभूल करू नये या मागण्यांसाठी सकल धनगर जमात महाराष्ट्र राज्याच्या वतीने आज दि.२३ सोमवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील राजे मल्हारराव होळकर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत ढोल ताशाच्या गजरात शिवतीर्थ याठिकाणी रॅली काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर चक्का जाम आंदोलन करण्यात आले.रास्तारोकोमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक ठप्प झाली होती परंतु रास्ता रोको दरम्यान रूग्णवाहिकेला रस्ता मोकळा करून देण्यात आला.यावेळी कृष्णा पितळे, बाळासाहेब मुळे, बाळासाहेब




सापनकर आणि डॉ.गणेश ढवळे यांची समायोजित भाषणे झाली. निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, शेख इसाक, पोलिस हवालदार संतोष राऊत, नवनाथ मुंढे, पोलिस अंमलदार उद्धव तांबे,दादा उबाळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राजेभाऊ गिरे, कृष्णा पितळे, बाळासाहेब मुळे, शहादेव धलपे,बाळासाहेब सापनकर , गणपत तागड, बालासाहेब जाधव,अनंतकाका मुळे, बालाजी मुळे, सुनिल फाटक, विक्रांत वाणी, विनायक वाणी,शहादेव खोसे, कृष्णा ढास, दादा कदम, अमोल पितळे, अशोक वाणी, अंकुश गायकवाड, बबन ढगारे, संतोष वाणी , पांडुरंग वाणी आदी लिंबागणेश परीसरातील समाज बांधव उपस्थित होते. सकाल मराठा समाजाच्या वतीने जाहीर पाठिंबा:- डॉ.गणेश ढवळे लिंबागणेश पंचक्रोशीतील सकळ मराठा समाज बांधवांनी धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे ( एसटी) प्रमाणपत्र वितरित करण्याच्या निर्णयाचा शासनाने आदेश काढावेत या मागणीला जाहीर पाठिंबा देताना मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र वितरित करण्यात यावे या मनोज जरांगे पाटलांच्या मागणीसाठी साखळी उपोषणापासुन रास्तारोको ते बीड जिल्हा बंदची हाक आंदोलनात धनगर समाज बांधवांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे त्यामुळे सकल मराठा समाजाच्या वतीने जाहीर पाठिंबा देत असल्याचे मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे यांनी जाहीर सांगितले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २४ सप्टेंबर २०२४
https://lokaarambh.com


# सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ पितुर घालून जिल्हाधिकारी कार्यालयासमो लक्ष्यवेधी आंदोलन:- डॉ.गणेश ढवळे

बीड:-(दि.२३) महाराष्ट्र सरकारचे शेतकरी विरोधी धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण असुन कृषी विषयक जाचक ई पीक पाहणी अट रद्द करून अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, बीड जिल्ह्यातील केवळ २ महसूल मंडळात ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान नाही हा कृषी विभागाचा वादग्रस्त अहवाल रद्द करावा, ओला दुष्काळ जाहीर करावा, सन २०२३ चार खरीप पिकविमा तातडीने द्यावा, शासनाने पिक कर्ज थकीत शेतकऱ्यांची खाती होल्ड न करण्याचे आदेश बँकाना द्यावेत आदि कृषी विषयक विविध मागण्यांसाठी आणि संवेदनाहिन सरकारच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२३. वार सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचे विधिवत पितुर घालुन लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख, बाळासाहेब मुळे आदी आंदोलनात सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव कृषीमंत्री, कृषी सचिव यांना निवेदन देण्यात आले.

अ )मागणी क्रमांक १
ई- पिक पाहणीची जाचक अट रद्द करावी ; निम्म्याहून अधिक शेतकरी पीक विमा आणि अनुदानापासून वंचित परळी येथील राज्यस्तरीय कृषी महोत्सव उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी ई पिक पाहणी अट रद्द करण्याची घोषणा केली होती.मात्र शासन आदेश निघालेच नाहीत घोषणा हवेतच विरली. बीड जिल्ह्यातील १० लाख ८४ हजार शेतकरी खातेदारांपैकी केवळ ३ लाख ४३ हजार शेतकऱ्यांनी ई पिक पाहणी केली आहे.त्यामुळे अर्ध्यापेक्षा जास्त




शेतकऱ्यांना पिक विमा व ईतर शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही. राज्य शासनाने सन २०२३ मधील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५००० रूपये प्रमाणे २ हेक्टर पर्यंत अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे.मात्र ज्यांनी मागील वर्षी खरीप हंगामात ई पीक पाहणी केली आहे केवळ त्यांनाच ५००० रूपये अर्थसहाय्य मिळणार असुन बीड जिल्ह्यातील १० लाख ६९ हजार शेतकरी खातेदारांपैकी केवळ ४ लाख ९३ हजार शेतकऱ्यांनी ई पिक पाहणी केली आहे त्यामुळे ५ लाख ७५ हजार शेतकरी खातेदार या अनुदानापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी आपला शब्द पाळुन जाचक ई पीक पाहणी अट रद्द करावी.

आ ) मागणी क्रमांक २
पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी २५ टक्के पीक विमा अग्रीम रक्कम तातडीने देण्याची घोषणा अजुनही हवेतच सप्टेंबर २०२४ मध्ये बीड जिल्ह्यातील ६१ महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई विमा योजनेतुन व्हावी यासाठी प्रधानमंत्री पीक विमा अंतर्गत जिल्ह्यात ४२० कोटीहुन आधिक रक्कम देण्यात आली आहे.यंदाच्या खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून २५ टक्के अग्रीम रक्कम तातडीने दिली जाईल असे आश्वासन कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुख्य ध्वजारोहण सोहळ्याप्रसंगी दिले होते दिले. यासंदर्भात त्यांनी पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यां सोबत बैठकही घेतली.मात्र २५ टक्के अग्रीम देण्याबाबत अजुनही संथगतीने काम सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे युद्ध पातळीवर काम करून तातडीने २५ टक्के पीक विमा अग्रीम देण्यात यावा.

इ) मागणी क्रमांक ३
महसूल व कृषीचे पंचनामे ३ आठवड्यानंतरही अद्याप अपुर्ण; सरसकट नुकसान भरपाई द्यावी बीड जिल्ह्यात ३१ ऑगस्ट व एक सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे ६१ महसूल मंडळे प्रभावी झाले होती.अतिमुसळधार पावसानंतर आठवडा लोटल्यानंतरही शेतात साचलेले पाणी जमिनीत न मुरल्याने पिके पिवळी पडुन वाया गेली आहेत. दरम्यान ३ आठवडे उलटल्यानंतर जिल्ह्यातील ६५ टक्के पंचनामे पुर्ण झाले असुन अतिवृष्टीमुळे तब्बल १०२५ गावातील ३ ८१ हजार २२७ शेतकऱ्यांच्या शेतातील ३ लाख ३५ हजार ६६१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना फटका बसला आहे.मात्र ३ आठवडे उलटुनही अद्याप महसूल व कृषी विभागाचे पंचनामे अद्याप अपुर्ण असुन तातडीने पूर्ण करण्यात येऊन सरसकट आर्थिक मदत करावी. फटका बसला असुन ७ लाख ५० हजार हेक्टर कृषी विभागाच्या अहवालातुन स्पष्ट झाले आहे.

ई) मागणी क्रमांक ४
बीड जिल्ह्यातील केवळ २ तालुक्यात ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान हा कृषी विभागाचा वादग्रस्त अहवाल रद्दबातल करावा. बीड जिल्ह्यातील केवळ २ तालुक्यात ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान कृषी विभागाचा अहवाल बीड जिल्ह्यात दि.१ आणि २ सप्टेंबर २०२४ रोजी तब्बल ६१ महसुली मंडळात अतिवृष्टी झाली होती.यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले होते.कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांनी पंचनाम्याचे आदेश देताना सरसकट आर्थिक मदतीचे आश्वासन दिले होते.मात्र दुसरीकडे कृषी विभागाने नुकसानीचा प्राथमिक अहवाल जाहीर केला असुन यामध्ये परळी व माजलगाव या दोनच तालुक्यात ३३ टक्केहुन आधिक नुकसान झाल्याचे म्हटले आहे.३५ महसूल मंडळात १०० मिमि पेक्षा जास्त पाऊस झाला होता. जिल्ह्यातील ६६८ गावांतील २ लाख हेक्टरहुन आधिक क्षेत्र बाधित झाले होते. एनडीआरएफ निकषाप्रमाणे ३३ टक्याहुन आधिक नुकसान असेल तरच शेतकरी शासनाच्या मदतीसाठी पात्र ठरतो त्यामुळे कृषी विभागाच्या या अहवालामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्यास अडचणी निर्माण होणार आहेत त्यामुळे त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

## अनुसयाबाई दिगांबर पाटील कदम यांचे निधन



नांदेड प्रतिनिधीनांदेड-किनवट : मंगलसांगवी ता.कंधार येथील जेष्ठ महिला स्मृतीशेष अनुसयाबाई दिगांबर पाटील कदम (वय ८५ वर्षे) यांचे दि.२३-सप्टेंबर रोजी सोमवारी रात्री १२:१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावरदुपारी१वाजता मंगलसांगवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. कै अनुसयाबाई कदम यांच्या पश्चात एक मुलगा पाच मुली नातू पणतू असा मोठा परिवार असून किनवट रजिस्ट्री ऑफिस येथील सेवानिवृत्त कर्मचारी तातेराव पाटील कदम यांची आई तर संभाजी ब्रिगेडचे किनवट तालुका अध्यक्ष सचिन पाटील कदम यांच्या त्या आजी होत.

## बोळसा गंप पुरग्रस्त शेतक-यांच्या साखळी उपोषणास कवळे गुरुजी यांची भेट




मारतळा प्रतिनिधी मारतळा : महादेव मंदिर बोळसा गंप येथे चालू असलेल्या उपोषणाला नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी भेट दिली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासह गंगापट्टीला विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजित राऊत साहेब यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला यावेळी असंख्य गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते

## माजलगावात धनगर समाजाचा एसटी आरक्षणासाठी दोन तास रस्ता रोको आंदोलन

ट्राफिक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला लागले दोन तास माजी आमदार होके आडसकर जगताप नाईकनवरे यादव यांनी दिला पाठिंबा माजलगाव दि.२३ (प्रतिनिधी )गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाजाची एसटी आरक्षणाची मागणी राज्यकर्त्यांच्या उदासीन धोरणामुळे प्रलंबित आहे या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा येथे दिनांक 23 सप्टेंबर रोजी तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या रोडवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला तब्बल दोन लागले . धनगर जमातीस एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी पंढरपुर ,लातुर,येथे दि.९ सप्टेंबर पासून राज्यव्यापी आमरण उपोषण सुरू आहेत या आंदोलनास पाठिंबा म्हणून दि. २३ सप्टेंबर रोजी सबंध महाराष्ट्रात रास्ता रोको आंदोलन करण्याचे हाक समाजाच्या वतीने देण्यात आली होती म्हणून त्या हाकेला ओ म्हणून माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा चौकत दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १वाजेपर्यंत तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलनात सहभागी होऊन माजीआ. राधाकृष्ण होके पाटील, रमेशराव आडसकर, नितीनराव नाईकनवरे, राहुल जगताप, शरद यादव, यांनी मनोगत व्यक्त करून जाहीर पाठिंबा दिला आहे.

तर समाजाच्या वतीने डॉ. भगवानराव सरवदे, तुकाराम येवले, विजय धायगुडे , प्रा. प्रकाश गवते, ज्ञानेश्वर सरवदे, अँड संतोष बाबरे,मुक्तीराम आबूज, राम अबुज ,राजा अर्जुन, यांनी मनोगत व्यक्त केली तर सूत्रसंचालन विशाल देवकते यांनी केले या रस्ता रोकोला बबनराव सरवदे अण्णासाहेब वगरे विलास नेमाने,अविनाशराव कांडुरे,सुभाषराव गडदे किसनराव हराळ कल्याणराव गवते प्रभाकर धरपडे ,नारायण सातपुते, डॉ अशोक तिडके, लक्ष्मणराव गायकवाड, कल्याण कसपटे, यांच्यासह हजारो तरुण वृद्ध याआंदोलनात सहभागी झाले होते यावेळी महसूल च्या वतीने महामुनी आणि रूपचंद आभारे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले यावेळी पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी चोक बंदोबस्त दिला होता

## खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**
दि. 23 सप्टेंबर 2024
दि. 21 सप्टेंबर 2024 रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या वतीने येथील कै. दादाराव कऱ्हाड (एम.आय.टी.) विद्यालयात 19 वर्षांखालील मुलांच्या तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेत खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त करून या क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले. तसेच दिनांक 30 सप्टेंबर 2024 रोजी बीड येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी हा संघ पात्र ठरला आहे.

या संघात कृष्णा चव्हाण, राहुल हारे ,समीर पठाण ,आर्यन वाघमारे, मनोज साठे ,ज्ञानेश्वर होळंबे, वैभव मोहिते, शेख शारेख, करण बीबे, वैजनाथ मोहिते ,आदित्य हारे ,विनायक गिरी इत्यादी विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रा.डॉ. माणिक पोखरकर ,प्रा.राहुल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले .



या सर्व विजयी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या क्रीडा मार्गदर्शकांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर ,कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा खोलेश्वर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी , वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. बिभीषण फड ,डॉ. दीपक फुलारी, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ.रवींद्र कुंबेफळकर ,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य आनंद पाठक ,पर्यवेक्षक व सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सकल मराठा बांधवांकडून मारतळा बाजारपेठ कडकडीत बंद

मारतळा / प्रतिनिधी
( विलास लामतलवारे )
मारतळा : लोहा तालुक्यातील मारतळा अंतर्गत २४ गावे असलेले ऊमरा सर्कल मध्ये कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. मराठा योध्दा श्री. मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी (ता. अंबड जिल्हा जालना) येथे उपोषण सहाव्या दिवशी ही सुरू असून उपोषणावर ते ठाम आहेत. मात्र राज्य सरकार त्यांच्या मागण्याकडे



दुर्लक्ष करत असल्यामुळे सकल मराठा समाज बांधवांनी त्यांना पाठींबा देत नांदेड जिल्हा बंदची हाक दिली. त्यास मोठा प्रतिसाद देत. मारतळा (ता.लोहा) येथील व्यापारी आपली दुकाने बंद ठेवत उत्स्फूर्तपणे शांततेत बंदला पाठिंबा देत. बंद शंभर टक्के यशस्वी केला



बीड तहसिलदार चंद्रकांत शेळके हे चौसाळा येथे आले असता त्यांचा ह्रदयसत्कार करताना चौसाळा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष विवेक कुचेकर,कृषी उत्तपन्न बाजार समितीचे माजी संचालक श्रीमंत सोनवणे सह आदी

# जगायचं राहून गेलं नाही पाहिजे...

**माजलगाव / प्रतिनिधी**

क्षणभंगुर जीवनामध्ये किती दिवस आहोत आणि कधी विकेट जाईल याची काहीच खबर नाही कोणालाच. आयुष्य जात रुसण्या फुगण्यात, अबोला पकडण्यात बऱ्याच वेळा आधी कोणी बोलाव यातही वर्ष निघून जातात. जीवनाच्या सर्विस मध्ये कोणीच परमनंट नाही मित्रांनो. आज आहे तर उद्या नाही, शेवटी फक्त फोटो रुपी आठवणीच राहतात.जगून घ्या, बोलून घ्या, मन मुराद हसून घ्या, आलंच रडायला तर रडून ही घ्या, रुसल असेल कोणी तर स्वतः बोलून सुरुवात करून पहा. प्रत्येक क्षण जगता आला पाहिजे. वय नोकरी व्यवसाय प्रतिष्ठा जात पात धर्म या पलीकडे जाऊन जगता आलं पाहिजे. नाचायची इच्छा असेल तर नाचून घ्या , लहानपणी वाटत मोठ व्हावं, मोठेपणी वाटत श्रीमंत व्हावं, आणि म्हातारपणी वाटत परत लहान व्हावं, या सगळ्या चक्रविवाहात जगायचं मात्र राहून जातं. ज्याला जे आवडतं त्यासाठी स्वतः वेळ काढावा. खूप कमवून तरी कुठ घेऊन जायचं आहे . आणि समजा कमवलं तर पुढच्या पिढीला ही टिकवता आलं पाहिजे. यावर ही आपला अभ्यास हवा . आज मन मारून जगाल ही पण तुमच्या मनाच काय ? पैसे नक्कीच कमवा पण स्वतःसाठीही थोडं जगा मित्रांनो. खूप काही कमाल ही पण स्वतःचे छंद स्वतःची आवड स्वतःच्या इच्छा , जत राहिल्या असतील तर ,मात्र सर्व काही कमावून ही



आपण कफल्लक आहोत, म्हणून मित्रांनो जगायचं राहून नाही गेलं पाहिजे असं जगा. मित्रांनो मी पांडुरंग शिंदे मी माझ्या जीवनामध्ये सहज विचार अनुभवला आणले व तुमच्यापर्यंत पोहोचवण्याकरता लिहित आहे.. मी एक वारकरी संप्रदायाचा पाईक आहे पांडुरंगाचा भक्त सद्गुरु गुरुनाम गुरु बंकट स्वामी महाराजांचा सेवक आहे, व संत विचाराचा एक विद्यार्थी आहे.... समय से पहले, और भाग्य से ज्यादा , किसी को कुछ नही मिलता..

लेखक
पांडुरंग महाराज शिंदे
( श्री गुरु बंकटस्वामी संस्थान निनगुर )

# सात दिवसापासून मंजरथ रस्ता कामासाठी सुरू असलेले उपोषण घेतले मागे.

## सभापती डक यांनी मध्यस्थी करत अधिका-यांकडून घेतले लेखी आश्वासन.

माजलगाव (प्रतिनिधी) दि.23 माजलगाव ते मंजरथ रस्त्याचे काम अंदाज पत्रकानुसार करण्यात यावे या मागणीसाठी शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष उत्तम पवार यांनी मराठवाडा मुक्तीदिनी गावकऱ्यांसह उपोषणास सुरुवात केली होती. उपोषणाच्या सातव्या दिवसी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी उपोषण स्थळी उपोषणकर्त्याची भेट घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी फैलावर घेतले.दरम्यान लेखी आश्वासनाने व अशोक डक यांच्या मध्यस्थीने उपोषणकर्त्याने उपोषण मागे घेतले आहे. दक्षिण काशी म्हणून पंचक्रोशीत लौकिक असलेल्या मंजरथ या गावचा रस्ता पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेतून सुरू करण्यात आला आहे.10 कोटी 70 लाख रुपये या कामावर खर्च करण्यात येत आहे.परंतु या रस्त्यावर अत्यंत थातूरमातूर पद्धतीने काम करण्यात येत आहे.कामावर कोणत्याही अधिकाऱ्याचे लक्ष नाही.अंदाज पत्रकानुसार काम करण्यात येत नाही.गावाचे महत्त्व पाहता या गावात दशक्रियेसाठी दररोज या रस्त्यावरून शेकडो वाहनाची येजा होते.परंतु याचं कुठलंही गांभीर्य संबंधित गुत्तेदाराला नाही.ही बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष उत्तम पवार यांनी गावकऱ्यांना सोबत घेऊन 17 सप्टेंबर मराठवाडा मुक्तीदिनी आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.आज उपोषणाचा सातवा दिवस आहे.परंतु अद्याप कोणीही अधिकाऱ्याने या उपोषणास भेट दिली नाही.सोमवारी दि.23 रोजी मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी उपोषण स्थळी भेट दिली.उपोषणकर्त्याची अस्तेवायीक चौकशी केली. तहसीलदार संबंधित अधिकाऱ्यांना उपोषणस्थळी बोलावून घेतले. संबंधित





प्रश्नाविषयी त्यांना धारेवर धरत तात्काळ उपाययोजना करण्याचे लेखी आश्वासन घेतले. त्यामुळे डक यांच्या मध्यस्थीने उपोषण करते उत्तम पवार यांनी आपले 7 दिवसापासून सुरू असलेले उपोषण मागे घेतले. यावेळी माजी सभापती संभाजी शेजुळ यांची उपस्थिती होती.

### मतदार संघातील सर्वच रस्ता कामे बोगस-अशोक डक

माजलगाव मतदार संघात रस्ता कामासाठी करोडो रुपयांचा विकास निधी आलेला आहे.ठीक ठिकाणी कामे सुरू आहेत.परंतु ही सर्वच कामे बोगस,दर्जाहीन करण्यात येत आहेत.अधिकाऱ्यांचे या कामावर लक्ष नाही.त्यामुळे गुत्तेदाराकडून मुजोरी करण्यात येते.दादागिरी सुरू आहे.अशा बोगस कामाविरोधात रस्त्यावर उतरणार असल्याचे मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी सांगितले.

## उलवेच्या कुलस्वामिनीचे २ ऑक्टोबर रोजी होणार उत्साहात आगमन.

**उरण प्रतिनिधी,**
उरण दि २३(विठ्ठल ममताबादे )
शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत व आम्ही उलवेकर मित्र मंडळ तसेच आम्ही उलवेकर महिला मंडळ, महेश स्पोर्ट्स क्लब शेलघर यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा उलवे मध्ये उलवेतील सर्वात मोठे नेत्र दीपक नवरात्रौत्सव मोठया उत्साहात साजरी केली जाणार आहे. त्या अनुषंगाने गुरुवार २ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ७:३० वाजता सद्गुरू स्वीट चौक, सेक्टर १७ ते स्व. जनार्दन घरत क्रिडांगण,प्लॉट नंबर ६८, सेक्टर १७ उलवे येथे महा आगमन सोहळा



मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे या सोहळ्याची दखल मुंबईच्या मंडळाने देखील घेतली आहे. रायगड जिल्हा मधून फक्त उलवेच्या कुलस्वामिनी आणि आम्ही उलवे कर मित्र मंडळ हयांची देखल घेतली गेली आहे.त्यामुळे मानाचा तुरा रोवला गेला आहे. यंदाचे नवरात्रौत्सवचे हे ७ वे वर्ष असून या नवरात्र उत्सव दरम्यान रील व्हिडिओ स्पर्धा, गरबा डान्स स्पर्धा, फेन्सी ड्रेस स्पर्धा आदी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.भाविक भक्तांनी नवरात्रातील सर्व उपक्रमात सहभागी व्हावे तसेच देवीचे दर्शन घ्यावे. असे आवाहन आम्ही उलवेकर मित्र मंडळचे संस्थापक सचिन राजे येरुणकर यांनी केले आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

मंगळवार २४ सप्टेंबर २०२४



## नारायण जयसिंगा पाटील पवळे यांचे निधन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट



नांदेड : उमरा ता.लोहा येथील जेष्ठ नागरिक स्मृतीशेष नारायण जयसिंगा पाटील पवळे (वय ९९ वर्षे) यांचे दि.२३-सप्टेंबर रोजी सोमवारी रात्री ९ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.२४-सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै.नारायण पाटील पवळे यांच्या पश्चात पत्नी, भाऊ चार मुले एक मुलगी नातू,पणतू असा मोठा परिवार असून रधुनाथ पाटील पवळे यांचे बंधू तर देविदास पवळे,शिवाजी पवळे,राम पवळे,परमेश्वर पवळे यांचे ते वडील होत.

# आरोपी अक्षय शिंदेचा पोलिसांकडून एन्काऊंटरचा झाला की केला? मोठी अपडेट

### बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर झाल्याने खळबळ उडालीये. पोलिसांनी सेल्फ डिफेन्समध्ये त्याचा एन्काऊंटर केल्याचं सांगितलं आहे

**मुंबई /प्रतिनिधी**

बदलापुर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर पोलिसांनी केला आहे. आरोपी अक्षय शिंदे याने पोलीस अधिकाऱ्याचे पिस्तुल खेचून तीन राउंड फायर केले. यामध्ये API निलेश मोरे जखमी झाले, त्यानंतर पोलिसांनी स्वरक्षणासाठी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर केला. मात्र हे प्रकरण दाबण्यासाठी अक्षय याला पोलिसांनी मारल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. या प्रकरणावरून सरकारवर आरोप केले जात असताना मोठी अपडेट समोर आली आहे.

अक्षय शिंदेच्या मृत्यूची विशेष तपास पथकाकडून चौकशी होणार आहे. आहे. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या देखरेखीखाली तपास होणार आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त तपास पथकाचे प्रमुख असणार आहेत. गुन्हे शाखेच्या ताब्यात असताना अक्षय शिंदेचा मृत्यू झाल्याने आर्थिक गुन्हे शाखेच्या डीसीपीकडून तपास होणार आहे. आरोपी अक्षय अण्णा शिंदे, वय 24, पॉक्सो कायद्याखाली विविध गुन्ह्यांसाठी तळोजा मध्यवर्ती कारागृहात न्यायबंदी होता. बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यातील गुन्ह्याच्या




तपासासाठी आरोपीला ट्रान्सफर वॉरंट सह ताब्यात घेतले. मुंब्रा बायपासजवळ पोलिसांच्या गाडीमध्ये आरोपीने पोलीस अधिकाऱ्याचे पिस्तुल खेचून तीन राउंड फायर केले. फायरमधून एक राउंड सपोनि निलेश मोरे यांच्या मांडीला लागला. स्वसंरक्षणार्थ पोलिसांनी प्रत्युत्तरात गोळीबार केला, ज्यात आरोपी अक्षय शिंदे जखमी झाला. जखमी अवस्थेत आरोपीला छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. आरोपीच्या मृतदेहाचे शवविच्छेदन जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथे केले जाणार आहे.पोलिसांवर दबाव होता. येथील राजकीय लोकांची प्रतिष्ठा महत्वाची होती आणि त्याला ठरवून स्वतःला मारून घेण्याची परिस्थिती तयार करून देण्यात आली का? आम्ही उच्च न्यायालयाच्या लक्षात उद्याच हा सगळे आणून देणार असल्याचं वकील असीम सरोदे यांनी केला आहे.



ठाणे : दिव्यातील गॉड गिफ्ट फाऊंडेशन ट्रस्टचे दिवा-दातीवली येथील न्यू गुरुकुल कॉन्व्हेंट स्कूल, या शाळेत इयत्ता ५ वी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती सदर स्पर्धेतील विजेते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला प्रसंगी शाळेच्या लिझा टीचर, प्रीती टीचर सचिन डी, सचिन के सर तसेच मुख्याध्यापकांसह शाळेचे संचालक श्री प्रेमनाथ म्हात्रे उपस्थित होते.

## बदलापूर चिमुरडीवर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू ; आत्महत्या की एनकाऊंटर !

ठाणे ता 23 सप्टेंबर : महिन्याभरापूर्वी बदलापूर पूर्वेतील एका नामांकित शाळेत दोन चिमुरडीवर अत्याचार करण्यात आल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. या घटनेनंतर बदलापुरातील नागरिकांचा उद्रेक पाहायला मिळाला. नागरिकांच्या उद्रेकानंतर पोलिसांनी या शाळेतील सफाई कर्मचारी अक्षय शिंदे याला अटक केली. पण याच आरोपीने आता स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अक्षय शिंदे याला ट्रान्झिट रिमांडसाठी नेण्यात येत असताना त्याने शेजारी बसलेल्या अधिकाऱ्याची बंदूक हिसकावून घेत स्वतःवर गोळी झाडली आहे. यामध्ये तो गंभीर जखमी झाला असून या घटनेत त्याचा बचाव करणाऱ्या अधिकाऱ्याला देखील दुखापत झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अधिक माहितीनुसार, तळोजा कारागृहातून साडेपाच वाजता आरोपी अक्षय शिंदे याला बदलापूरला नेण्यात येत होते. याचवेळी त्याने एपीआय निलेश मोरे यांची बंदूक हिसकावून त्याने सुरुवातीला पोलिसांवर गोळी झाडली. ज्यानंतर पोलिसांनी स्वतःच्या संरक्षणासाठी अक्षयवर तीन गोळ्या झाडल्या. पण महत्त्वाची बाब म्हणजे सर्वात पहिल्यांदा जी बातमी समोर आली, त्यामध्ये



अक्षयने स्वतःवर गोळी झाडल्याचे सांगण्यात आले. पण क्षणाक्षणाला बदलत असलेल्या अपडेटमुळे अक्षय शिंदे याने खरंच आत्महत्येचा प्रयत्न केला की त्याचा एन्काउंटर करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. आरोपी अक्षय शिंदे हा पोलिसांच्या व्हॅनमधून बदलापूर येथे जात असताना मुंब्रा बायपास येथे ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये ही एन्काउंटरची घटना घडली आहे. अक्षयने पोलिसांच्या बंदुकीतून एकूण तीन राऊंड फायर केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. परंतु, या घटनेनंतर आता विरोधकांनी हा मृत्यू म्हणजे एन्काउंटर असल्याचे मत व्यक्त केले आहे. तर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

# माहूर शहरातील मुख्य रस्त्यावरील मास-मच्छीचे दुकाने तात्काळ हटवा - युवा ग्रामीण पत्रकार संघ,माहूर.

**श्रीक्षेत्र माहूर - अत्रिनंदन मोरे**

माहूर हे एक साडेतीन शक्ती पीठांपैकी एक पूर्ण शक्तीपीठ असल्याने दूरवरून भाविक हे दर्शनासाठी येतात आणी त्यामध्ये आंद्रप्रदेश व तेलंगणा भागातून येणाऱ्या भाविकास माहूरला आल्यानंतर सर्वप्रथम शासकीय रुग्णालयामागे फेकलेल्या मासाचा दुर्गंध घ्यावा लागतो व तसेच मालवाडा येथील शाळकरी विध्यार्थी हे त्याच रस्त्याने पायी ये-जा करत असतात तर त्यांना अक्षरशः नाक बंद करून स्वास रोखून तेथून ये-जा करावे लागते तसेच मालवडा घाटंखालून दररोज तालुक्याला येणाऱ्या लोकांना याचा खूप त्रास सहन करावा लागतो आणी नंतर लगेच शहरातील मासांच्या दुकानाचे दर्शन होतात. आता शारदीय नवरात्रोत्सव येत आहे त्यामुळे येणाऱ्या भाविकांचे धार्मिक स्थळ असलेल्या माहूरकडे बघण्याचा दृष्टिकोन हा बदलतो आहे व तसेच माहूर शहरातील मुख्य रस्त्यावरील सर्व पथदिवे हे कित्येक दिवसापासून बंद असून त्याकडे नगरपंचायत चे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे. हे कुठेतरी श्री क्षेत्राच्या अस्मितेचा प्रश्न असून ही एक निंदनीय बाब आहे. हे लक्षात घेऊन मा. मुख्याधिकारी साहेबांनी सदर बाबीची दखल घेऊन माहूरच्या अस्मितेला कुठलाही काळा डाग लागू नये याचा विचार करत तातडीने मुख्य रस्त्यावरील मास-मच्छीचे दुकाने हटवावे असे निवेदन युवा ग्रामीण पत्रकार संघ,माहूर यांच्या वतीने देण्यात आले तेव्हा युवा ग्रामीण पत्रकार संघांचे तालुकाध्यक्ष गोपाल खापर्डे, युवा आघाडी तालुका अध्यक्ष आदेश बेहेरे, सदस्य प्रवीण बर्डे, उपाध्यक्ष समाधान कांबळे, अनिल



मेडपेलवार,शंकर भालेराव व अंबादास मुकटे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. मागील काही दिवसाखाली नगरपंचायतला सविस्तर निवेदन देऊन आणी बऱ्याच वृत्तपत्रात बातम्या झळकून सुद्धा तात्पुरत्या स्वरूपात सदर घटनेला आळा घातला होता परंतु हे काही दिवसापूरते च मर्यादित होते यावरून असे लक्षात येते की नगरपंचायत प्रशासन हे कुंभकर्णी झोपेत असते आणी जेव्हा त्यांना कुणी जाग आणून देईल तेव्हा ते तात्पुरते आम्ही जागे आहोत किव्हा आम्ही काम करण्यास अग्रेसर आहोत असे दाखवण्यासाठी काम करतात आणी पुन्हा कुंभकर्णी झोप घेण्यास तय्यार असतात हे मात्र स्पष्ट दिसून येत आहे. पण नव्यानेच रुजू झालेले मुख्याध्याकारी मा. विवेक कांदे हे आपल्या माहूर नगरपंच्यातीच्या विकासाठी किव्हा माहूर या तीर्थक्षेत्राच्या अस्मितेला कुठलाही काळा डाग लागणार नाही यासाठी काय करतात याकडे सर्व माहूर वासियांचं लक्ष लागलेलं आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com